आद्य संस्थापक



कै. गो. ना. अक्षीकर

# जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट, दादर

स्थापना - १८८९

# अक्षीयन

ई - मासिक • २४ एप्रिल २०२५

| क्र | अनुक्रमणिका |
|---|---|
| 1 | |
| 2 | |
| 3 | |
| 4 | |
| 5 | |
| 6 | |
| 7 | |
| 8 | |
| 9 | |
| 10 | |
| 11 | |
| 12 | |

# : संपादकीय :

शिक्षण आणि साहित्य समाजाच्या आराखड्याची शिल्पकार आहेत . म्हणूनच अक्षीयन हे इ मासिक आपल्या हाती देताना खूप मनस्वी आनंद होत आहे.

तुम्हाला माहिती आहे का ? आपल्या संस्थेचे आद्य संस्थापक कै. गोपाळ नारायण अक्षीकर यांनी आपली स्वतःची प्रॉपर्टी विकून वेळप्रसंगी त्यांच्या सौभाग्यवतींचं सोनं मोडून ही संस्था उभी केली. परंतु एकाही वास्तूला किंवा वस्तूला आपल नाव दिलं नाही. किंबहुना आपल्या वंशावळीतील कुणाला या संस्थेत हक्क दिला नाही. अशा महान निस्वार्थी ,निस्पृह, निष्कलंक , निरलस व्यक्तिमत्त्वास माझा मानाचा मुजरा...

शिक्षणाची ज्ञानगंगा बहुजन समाजापर्यंत पोहोचवण हे उद्दिष्ट मनाशी बाळगून, क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे.. हे ब्रीद घेऊन गोपाळरावांनी आपल्या कार्यास १८८९ ला सुरुवात केली. मुंबई, ठाणे ,रायगड या तीन जिल्ह्यांमध्ये आपल्या शैक्षणिक कार्याचा झेंडा रोवला. यामुळे अनेक कुटुंबांना रोजगार मिळाला. अनेक विद्यार्थ्यांना आपल्या जीवनाची दिशा मिळाली अशा महान प्रभूतींमुळेच आजचा आधुनिक भारत आपल्याला बघायला मिळतोय हे आपलं सदभाग्यच..

वरील सर्व बाबींचा विचार करून अक्षीकरांनी केलेल्या कार्याला छोटीसी मानवंदना म्हणून अक्षीयन हे इ मासिक या वर्षापासून सुरू करण्याचा संस्थेने निर्णय घेतला.अक्षीयन मध्ये शिक्षक शिक्षकेतर कर्मयोगी, विद्यार्थी यांच्यातील सुप्त गुणांना एक व्यासपीठ उपलब्ध व्हावा या हेतूनेअक्षीयन या इ मासिकाची निर्मिती करण्यात येत आहे. शाळेतील उपक्रमांची माहिती, विद्यार्थ्यांचे विविध बौद्धिक, सांस्कृतिक, सामाजिक , शैक्षणिक व कलानैपुण्य तसेच शिक्षकांमधील साहित्यिकांना एक समृद्ध व्यासपीठ त्यांच्या कलागुणांना बहर मिळण्यासाठी एक हक्काचं असं इ मासिक आपण द्यायचं ठरवलं. यात शिक्षकांपासून ते विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांना सहभागी होता येईल.

शिक्षण ही केवळ ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया नसून ती व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासाची वाटचाल असते. साहित्य हे त्या शिक्षणाचे जिवंत प्रतिबिंब असते. समाजाची विचारसरणी, मूल्यव्यवस्था आणि संस्कृती ही शिक्षण आणि साहित्याच्या परस्पर पूरकतेतूनच आकार घेत असते.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात माहितीचा ओघ अफाट आहे, परंतु त्या माहितीचे ज्ञानात रूपांतर होण्यासाठी विवेक आणि संवेदनशीलता यांची गरज अधिक आहे. हे दोन्ही घटक शिक्षणातून विकसित होतात आणि साहित्याच्या संगतीत रूजतात. मराठी साहित्यातील संत परंपरा, ज्ञानेश्वर, तुकाराम यांची अभंगवाणी किंवा आधुनिक साहित्यातील पु. ल. देशपांडे, व. पु. काळे यांची सौम्य विनोदबुद्धी, बहिणाबाई चौधरी यांची अमोघवाणी – हे सगळं शिक्षणालाही एक मानवी चेहरा देतं.

आपल्या मासिकाचा उद्देश फक्त माहिती देणे हा नाही, तर वाचकाला विचारप्रवृत्त करणे, त्याचं मन समृद्ध करणं आणि त्याच्या संवेदनशीलतेला उजाळा देणं हा आहे. विद्यार्थ्यांपासून शिक्षकांपर्यंत, लेखकांपासून वाचकांपर्यंत सगळ्यांच्या अंतरंगात हे मासिक एका नवीन दृष्टिकोनाचा बीजवाप ठरावं ही आमची इच्छा आहे. या मासिकाच्या माध्यमातून आपण शिक्षणविषयक नवनवीन संकल्पना, साहित्याचे विविध पैलू, आणि समाजातील बदलतं वास्तव यांच्यावर चिंतन करत राहू. प्रत्येक अंकात नवे विचार, नव्या दिशा, आणि नव्या प्रेरणा देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

संस्थेला ,समाजाला पूरक असे विचार यातून आपल्याला मांडता येतील. यासाठी एक संपादकीय समिती नेमण्यात आलेली असून संस्थेचे कार्यवाह याचे पदसिद्ध संपादक असतील तर उपकार्यवाह सहसंपादक असतील. संस्थेतील विविध शाळांमधून वेगवेगळ्या विषयांचे पाच ते सात शिक्षक या संपादकीय समितीत असतील. दर महिन्याला एक ते पाच तारखेच्या दरम्यान हे इ मासिक प्रकाशित होईल. सर्व मुख्याध्यापक या समितीचे पदसिद्ध सदस्य असतील. आपल्या शाळेतील होणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती ते या संपादकीय समितीकडे पाठवतील. यातून संस्थेत एक निरोगी , निकोप व निरलस स्पर्धा सुरू होऊन शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंदा सोबतच विद्यार्थ्यांनाही एक समृद्ध व्यासपीठ देणारा अक्षीयन हा अंक शैक्षणिक कार्याचा झेंडा गौरवाने आकाशात फडवण्यास संस्थेला नक्कीच मदत करेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**जाता जाता एवढेच म्हणेन...**

**शब्दांना दिशा द्या...!**

**विचारांना पंख द्या...!!**

**आणि ज्ञानाच्या आकाशात नवे उड्डाण घ्या......!!!**

सृजनहो हा अंक आजपासून ज. ए. इ. च्या सेवेत समर्पित करतो.

संपादक

विकास मुकुंदराव पाटील

कार्यवाह

ज.ए.इ,दादर, मुंबई २८

**संपादक मंडळ**

श्री. विकास पाटील

कार्यवाह.

श्री. महेश केळकर.

उपकार्यवाह.

डॉ. प्रतीक्षा बोर्डे.

मो. ह. विद्यालय, ठाणे

सौ. सई पटवर्धन

ज. ए. इ. हायस्कूल, कल्याण

सौ. तृप्ती  तौमर

सौ. श्वेता चव्हाण

GEI's Blossom International School, Dombivli

सौ. गीता मंत्री

प. रा. विद्यालय ,भिवंडी

# साहित्य

छबिलदास ची गाथा

छबीलदास आमची आवडती शाळा,

अक्षीकर सरांनी फुलवला ज्ञानाचा मळा ..

शंभर वर्षांची शाळा,

मोठी आहे फार,

आम्ही विद्यार्थी शाळेचा आधार ||१||

शिक्षक शिकवतात छान, मित्र मैत्रिणी भारी

खेळायला मिळत खूप मज्जा येते लय भारी....

स्पर्धा होतात येथे, जिंकण्याचा ध्यास.

हरलो तरी चालेल शिकतो नवा अभ्यास ||२||.

भविष्यात शाळा होणार मोठी छान.

डिजिटल लायब्ररी मध्ये ज्ञान मिळेल छान.

विज्ञानात करू नवीन प्रयोग.

पर्यावरण वाचवायला लावू वृक्ष योग ||३||

छबिलदास शाळा आमची छान.

माझी शाळा माझी शान.

ज्ञानाची ज्योत येथे सदैव तेवत राहो.

छबीलदास शाळेचे नाव जगात गाजत राहो ||४||

कवयित्री

—कुमारी आयेशा सय्यद (इयत्ता 7वी)

छबिलदास हायस्कूल दादर माध्यमिक विभाग

From Chaitanya Vijay Naik, Class-6/B, Roll no.26
Blossom International

**BREAK THE SILENCE, HEAL THE MIND**

When words stay locked inside your heart,
They pull you down, they break apart.
But when you speak, the weight is shared,
It shows the world that someone cared.

Our minds are strong but sometimes break,
From all the fears that we can't shake.
But when we talk, we find our way,
The darkness fades, we see the day.

Each voice can help, each word can heal,
It lets us say the things we feel.
So don't stay quiet, don't pretend,
Reach out to someone, find a friend.

We're not alone, though it feels tough,
Together, love will be enough.
Break the silence, let light in,
That's how true healing can begin.

Each step you take, each truth you find,
Will help you heal and free your mind.

THANK YOU.

**When I saw Rani Lakshmibai in my dream**

Rani Lakshmibai came into my dream,
With courage in her eyes, a warrior's gleam.
She spoke with passion, her voice clear and bright,
"Serve your nation, with all your might."
Teach the young, nurture their minds,
Help them grow, leave the past behind.
Work for justice, equality too,
And help India's dream come true.
Remember Jhansi's brave queen
Who fought for freedom, unseen.
Her spirit lives on, in you and me,
To serve our nation, wild and free.
Rani Lakshmibai's words still echo in my mind.
A call to action, a noble deed to find.
I woke with determination, a new found zeal.
To serve my nation, with every breath I feel.

**- Rebecca Thomas, Std. VII A**



मरण हे नक्की आहे !

====================

दि.२२/०४/२०२५.

तारीख, वार, वेळ आपली पक्की आहे
कुणी अमर नाही मरण हे नक्की आहे ॥ धृ ॥

कमवले किती गमवले सारे व्यर्थ होई
जपलेल्या नात्यांची कमाई सार्थ होई
शुभ कर्मांची साथ सदा लक्की आहे ॥ १ ॥

अदृश्य जगाचे संकेत सारे ओळखावे
जागृत होऊन स्वरूप स्वतःचे पहावे
सर्व बोलते जरी नियती मुकी आहे ॥ २ ॥

पाप-पुण्याची चोपडी अंतर्मनात आहे
स्वर्ग-नरकाची दिशा या  हृदयात आहे
जीवन दळणाची अजब चक्की आहे ॥ ३ ॥

=====================

कवी : अनिल नामदेव शहाकर.

ज. ए. इ. चे न्यू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, जोशीबाग,
कल्याण (प.), जि. ठाणे.

चित्र पाहताच मनात आलेले विचार अभंग रचनेतून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला.

-----------////----------

मोबाईल अभंग

पाहता फलक | होतसे अचंबा ||
मोबाईल थांबा | विचित्रच ||
जडता व्यसन | जाते मान खाली ||
तयांचाच वाली | असा स्तंभ ||
काळाची गरज | भासे नवे त्यात ||
दिसतो हातात | मोबाईल ||
कारण क्षूल्लक | दवडतो वेळ ||
आयुष्याचा खेळ | मांडीयेला ||
आवर घालून | करूया आपण ||
नियम पालन | क्षणोक्षणी ||
अशी चिन्हे सारी | नको भविष्यात ||
मुलांच्या मनात | घालमेल ||
मोबाईल विश्व | भयानक फार ||
त्याला सारु दूर | मिळोनिया ||
विनवी प्राजक्ता | टाळ अतिरेक |
असे जो घातक | जीवनात ||

©सौ. प्राजक्ता कुलकर्णी
प. रा. विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय, भिवंडी

## मराठी भाषा दिन

( भाषा टिकली, तरच संस्कृती टिकेल! )

मराठी भाषा दिन ‘२७ फेब्रुवारी’लाच का साजरा केला जातो?

२०१३ पासून '२७ फेब्रुवारी' हा दिवस 'मराठी भाषा दिन' म्हणून साजरा केला जात आहे.

अथक प्रयत्न-संघर्ष आणि १०८ हुतात्म्यांच्या आहुतीनंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन मुंबई ही राज्याची राजधानी बनली. महाराष्ट्र राज्यामध्ये मराठी भाषिक बहुसंख्य असले, तरी मराठी भाषेला राजभाषा होण्यासाठी काही कालावधी जावा लागला. बरेचसे साहित्यिक, पत्रकार, क्रांतिकारक यांनी दिलेल्या लढ्यामुळे मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला. मराठी भाषेबद्दल अनेक संत, साहित्यिकांनी खूप काही लिहून ठेवले आहे. मातृभाषेची तुलना अमृताशी करताना संत ज्ञानेश्वरांनी यांनी ‘माझा मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेहि पैजासी जिंके’ असे म्हटले आहे.

कुसुमाग्रज यांच्या मराठी साहित्यातील अतुलनीय योगदानाबद्दल मराठी भाषा प्रेमींकडून हा दिवस उत्साहात साजरा केला जातो.

# Holi

Holi is an important India festival. It is celebrated in the season of spring- month of Phagun. Young girls and boys come back home and collect twigs and branches of trees. They are placed in the squares of town. Elder people perform pooja offering garlands of flowers and sweet roti. Then the dry heaps of wood are burned.

All the family members gather around Holi at the full moon night. It is like a bonfire ceremony of enjoyment. People sing songs, eat sweets and snacks. Sherbet is offered to all guests.

It is believed that anger, enmity and jealousy are burnt. People forgive and forget quarrels. They forget old enmity and express love. Colours are thrown in happiness. Hence Holi is a festival of colours. Holi brings joy, unity and friendship in society. Burning of Holi is the burning of demons.

People visit friends and relatives for five days. Climate is pleasant in Phalgun. Throwing colours is not only fun but also a type of greeting - forgetting hatred and sorrow. Holi is my favourite festival as it creates love and brotherhood.

Name -Shreya Rohit Dharmadhikari

Roll no -15

Class 4-D

# Our Responsibility to Mother Earth

**In today's world, where climate change looms large and natural resources dwindle, the importance of environmental awareness cannot be overstated. It's not just a buzzword or a passing trend; it's a critical call to action for every individual, community, and nation to take responsibility for the planet we call home.**

## Understanding the Issues

At the heart of environmental awareness lies an understanding of the pressing issues facing our planet. Climate change, caused primarily by human activities such as burning fossil fuels and deforestation, threatens ecosystems, wildlife, and human livelihoods worldwide. Rising temperatures, melting ice caps, more frequent extreme weather events, and shifting habitats are just some of the visible consequences.

Pollution, another significant concern, manifests in various forms: air pollution from industrial emissions and vehicles, water pollution from untreated sewage and agricultural runoff, and plastic pollution choking our oceans. Each of these pollutants not only harms wildlife but also enters the food chain, affecting human health.

## The Role of Individuals

While these challenges seem daunting, every individual can contribute to positive change through simple daily actions. Conserving energy by turning off lights and appliances when not in use, reducing waste by recycling and reusing items, and using public transportation or biking instead of driving are effective ways to lower our carbon footprint.

Being mindful of our consumption habits also plays a crucial role. Opting for sustainable products, reducing single-use plastics, and supporting businesses that prioritise eco-friendly practices encourages broader adoption of responsible environmental stewardship.

## Education and Advocacy

Education plays a pivotal role in nurturing environmental awareness, starting from early childhood through programs that instil a love for nature and an understanding of environmental interdependence. Schools and communities can organise tree-planting drives, clean-up campaigns, and educational workshops to empower individuals with the knowledge and skills needed to protect the environment.

Advocacy at local, national, and global levels amplifies individual efforts. Supporting policies that promote renewable energy, habitat conservation, and stricter environmental regulations ensures systemic change beyond personal actions.

## Global Collaboration

Environmental issues transcend borders, making global collaboration imperative. International agreements like the Paris Agreement aim to unite nations in reducing greenhouse gas emissions and adapting to climate impacts. Initiatives such as reforestation

projects in deforested regions and marine conservation efforts highlight the importance of collective action in preserving biodiversity and ecosystems.

**Conclusion**

In conclusion, environmental awareness is not merely an option but a moral imperative for safeguarding our planet's future. By fostering a deep respect for nature, promoting sustainable practices, and advocating for policy changes, we can mitigate environmental degradation and create a sustainable world for future generations. Each of us has a role to play in this collective endeavour. Let us act today, mindful of the impact our choices have on the Earth, and strive towards a harmonious coexistence with nature. Together, we can make a difference— one conscious decision at a time.

**- Pratik Patil, Parent of Swraansh Patil, Std. Nursery B**



# सन्माननीय

# जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट दादर, मुंबई

आद्य संस्थापक



कै. श्री. गो. ना. अक्षीकर

## श्री. विजय श्रीधर कामेरकर पुरस्कृत
## कै. सौ. सुरेखा श्रीधर कामेरकर
# आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४-२५

## आयोजित

# सन्मानपत्र



प्रति,

मान्नीय सौ. अनिता दीपक सुतार

सप्रेम नमस्कार !!

महोदया,

आपण ज. ए. इ. ची पूर्व प्राथमिक शाळा भिवंडी येथे ७ जून २००५ पासून सहाय्यक शिक्षिका या पदावर कार्यरत आहात. आपली एकूण सेवा २० वर्षे झालेली आहे.

आपण आपल्या प्रदीर्घ सेवेमध्ये शालेय, सहशालेय कार्यक्रमात हिरीरीने सहभागी होता. आपल्याला चित्रकला, पाककला व पर्यटन याची विशेष आवड आहे. आपण विद्यार्थी प्रिय शिक्षिका आहात. विद्यार्थ्यांचे कलागुण ओळखून त्यांच्या पालकांना त्या अनुषंगाने योग्य मार्गदर्शन करता.

१ जानेवारी २०२३ रोजी संस्थेने आपली शाळेत मुख्याध्यापिका पदावर नियुक्ती केली आहे. शाळेतील सहकारी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी याबरोबरच पालक यांच्यामध्ये रमायला तुम्हाला आवडते.

शालेय पटसंख्या वाढीसाठी दरवर्षी आपण सतत प्रयत्नशील असता. शाळेचा पट स्थिर ठेवण्यासाठी तुम्ही घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणता. आपल्या विशेष प्रयत्नांमुळे पूर्व प्राथमिक शाळा भिवंडी (मराठी मडियम) येथे आज ३१५ एवढी विद्यार्थी संख्या पटावर आहे.

वर्गातील अप्रगत विद्यार्थ्यांना वेगवेगळे उपक्रम राबवून त्यांना प्रगत करण्याचा प्रयत्नही करता, विद्यार्थ्यांना वाचन, लेखन करण्यास आणि वाळूमध्ये अक्षरे गिरवणे, आडव्या, उभ्या रेषा काढून त्यांना बोलके करता. तुम्ही जेव्हा तास घेता त्यात मुले आनंदाने अध्ययनात रममाण होतात.

शालेय अभ्यासक्रमासोबतच व्यावहारिक जीवनात उपयोगी असणारे जीवन शिक्षण विद्यार्थ्यांना देण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील असता.

अशा या आपल्या संस्थेतील ज. ए. इ. च्या भिवंडी येथील पूर्व प्राथमिक विभागातील मुख्याध्यापिका सौ. अनिता दिपक सुतार मॅडम यांना संस्थेचा आदर्श शिक्षिका पुरस्कार देताना आम्हांस अतीव आनंद होत आहे.

दिनांक : २४ एप्रिल २०२५

| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | कार्यवाह |
|---|---|---|
| जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट, दादर |

जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट दादर, मुंबई

आद्य संस्थापक



कै. श्री. गो. ना. अक्षीकर

# कै. य. वि. भातखंडे पुरस्कृत
# कै. केशव गोपाळ अक्षीकर
# आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४-२५

आयोजित



## सन्मानपत्र

प्रति,

**माननीय श्री. अरुणा उत्तमराव पाटील**

सप्रेम नमस्कार !!

महोदया,

आज संस्थेच्या वर्धापन दिनी आदर्श पुरस्काराने सन्मानित करतांना आम्हास अतीव आनंद होत आहे.

सन्मान तव कार्याचा,<br>
सन्मान तव ध्येयाचा,<br>
सन्मान तव संस्थेप्रति,<br>
असलेल्या निष्ठेचा

२१ जून १९९१ रोजी आपण संस्थेच्या प्राथमिक शाळा डोंबिवली या शाळेत रूजू झालात. गेल्या ३३ वर्षात आपण शिक्षण क्षेत्रात कार्यरत असताना एम्. ए./बी. एड/डी. एस. एम. / हिमालया वुड बॅज कब लेडी मास्टर अशी शैक्षणिक गुणवत्ता वाढवली.

संस्था व शासन आयोजित शैक्षणिक, नाट्य, शिष्यवृत्ती, स्काऊट गाईड या क्षेत्रातील सर्व टप्पे पार करत जिल्हा पातळीवर तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून आपण काम केले. आपल्या गणित विषयाच्या मार्गदर्शनामुळे तब्बल ३१ विद्यार्थ्यांना पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती प्राप्त झाली. भारत स्काऊट आणि गाईडच्या माध्यमातून १५ कब आणि १८ बुलबुल यांना या क्षेत्रात सर्वोच्च मानला जाणारा 'राष्ट्रीय सुवर्णबाण' पुरस्कार मिळवून शाळेच्या नावलौकीकात मानाचा तुरा खोवला आहे. विशेष म्हणजे या निमित्ताने विद्यार्थ्यांना विमान प्रवासाचा सुखद अनुभव आपण घडविलात. आतापर्यंत आपणास नाट्यलेखन, अभिनय, दिग्दर्शन, नेपथ्य, निबंधलेखन, हस्ताक्षर, क्रीडा स्पर्धा, शैक्षणिक साहित्य निर्मिती अशा विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळाली शाळेतील सर्व उपक्रमात आपण उत्साहाने सहभागी होतात तसेच विविध एन.जी.ओ. च्या मार्फत शाळेसाठी पुस्तके, विज्ञानपेटी, टॅब, स्मार्ट बोर्ड, प्रोजेक्टर अशी अनेक शैक्षणिक साहित्य मिळवून देतात.

आपण संस्थेच्या संचालक मंडळ सदस्या, कर्मचारी संघ उपकार्यवाह, घटना दुरुस्ती समिती, क्रेडीट सोसायटी सदस्या अशा विविध जबाबदाऱ्या लीलया पेलल्या आहेत. स्वकर्तृत्व व प्रचंड आत्मविश्वास या जोरावर आपण अनेक क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. भारतीय महिला फेडरेशन ठाणे याचे गेली कित्येक वर्षे आपण कोषाध्यक्ष पद सांभाळत आहात. आपण सामाजिक भान ठेवून २१ वेळा रक्तदान केले आहे.

स्त्रीसक्षमीकरणाच्या अनेक उपक्रमात आपण सहभागी होता.

आपल्या कार्याची दखल घेवून आपणास क. डो. म. न. पा. व ठाणे म. न. पा. यांच्याकडून महापौर आदर्श शिक्षक पुरस्काराने तसेच अनेक संस्थांनी पुरस्कृत केले आहे.

आपल्यासारख्या विद्यार्थी प्रिय, शिस्तप्रिय, लढवय्या, कार्यतत्पर अशा अष्टपैलू शिक्षिकेचा सन्मान करतांना आम्हास अतीव आनंद होत आहे.

आपल्या पुढील वाटचालीस शुभेच्छा !

दिनांक : २४ एप्रिल २०२५

| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | कार्यवाह |
|---|---|---|
| जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर |

## जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट दादर, मुंबई

आद्य संस्थापक



कै. श्री. गो. ना. अक्षीकर

# कै. य. वि. भातखंडे पुरस्कृत
# कै. केशव गोपाळ अक्षीकर

# आदर्श शिक्षकेतर पुरस्कार २०२४-२५

आयोजित

## सन्मानपत्र



प्रति,

**माननीय श्री. अतुल एकनाथ उगले** (शिक्षकेतर कर्मचारी)

सप्रेम नमस्कार !!

महोदय,

दि. १८ ऑक्टोबर १९९७ या दिवशी जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूटच्या प. रा. विद्यालय, भिवंडी या शाळेत आपण रूजू झालात. कुटुंबातील प्रथम अपत्य असल्यानेच जबाबदारपणामुळे सर्वपरिचित झालात. आपल्या कन्या व धर्मपत्नी यांच्या जडणघडणीत आपल्यातील शिक्षणाची आस प्रतीत होते. स्वभावत: धार्मिक असलेल्या आपण घरगुती गणपती डेकोरेशन स्पर्धा २०२२ ते २०२४ सलग तीन वर्षे गाजवलीत. ज्यात अर्धांगिनीची साथ उल्लेखनीय ! सतत धडपड करण्याची आपली वृत्ती नोकरीत असतानाही वाहनचालन कला जोपासू शकली. कौटुंबिक आर्थिक समतोल ज्यायोगे साधता आला. हे सर्व करताना कुळाचा पारंपारिक गोंधळ जो आपल्या जिव्हाळ्याचा विषय भवानीचे गोंधळी म्हणून उभा ठाकलेल्या आपण गोंधळ स्पर्धेमध्ये ४० गटातून प्रथम क्रमांक पटकावलात आणि तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री. एकनाथजी शिंदे यांच्याकडून गौरविले गेला होतात. अनेक मराठी मालिका व नवरात्र उत्सवात गोंधळ सादर केले. शासकीय कामाची जाण असलेल्या आपण शाळेच्या कामांसाठी एस. एस. सी. बोर्ड, जिल्हा परिषद, शिक्षण उपसंचालक कार्यालय, वेतन पथक इत्यादी कार्यालयाची कामे तत्परतेने व आत्मीयतेने पार पाडतात. विद्यार्थी वाढीसाठी योजलेल्या उपक्रमांसाठी मेहनत घेऊन परिपत्रक वाटणे, बॅनर्स लावणे या माध्यमातून शाळेचा प्रचार केला आहे व करीत आहात आणि म्हणूनच कर्मचाऱ्यांमधील सुप्त गुणांना वाव देणाऱ्या आपल्या संस्थेने आज दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी आदर्श शिक्षकेत्तर पुरस्कार देऊन आपणास सन्मानित केले.

दिनांक : २४ एप्रिल २०२५

| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | कार्यवाह |
|---|---|---|
| जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर |

# जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट दादर, मुंबई

## कै. य. वि. भातखंडे पुरस्कृत कै. केशव गोपाळ अक्षीकर

# आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४-२५

आद्य संस्थापक



कै. श्री. गो. ना. अक्षीकर

## आयोजित

# सन्मानपत्र



प्रति,

**माननीय डॉ. प्रतीक्षा प्रसाद बोर्डे**

सप्रेम नमस्कार !!

महोदया,

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट संचलित मो. ह. विद्यालय ठाणे येथील व समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक वारसा जपणाऱ्या एका नामांकित शाळेत आपण तज्ज्ञ मराठी शिक्षिका म्हणून गेली तीस वर्षे सेवार्थ आहात. एक उत्कृष्ट निवेदिका, कथाकथनकार, स्वसिद्ध लेखिका म्हणून प्रसिद्ध आहात. भूतकाळाच्या पडद्याआड डोकावून पाहिलं तर ९० - ९२ च्या आसपास जळगाव गावाहून आलेली एक मुलगी, नोकरीच्या शोधात आलेली बहीण आणि मेहुणे डी. एम. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तावून सुलाखून स्वत:ला जळजळीत सोन्याची लकाकी देऊन, उच्च शिक्षण घेऊन मो. ह. विद्यालयाच्या दालनात प्रवेश केलेली आणि यशाची दालने जणू आपल्याच प्रतिक्षेत होती अशा आविर्भावात शिक्षणाची एक-एक पायरी चढून उच्च शैक्षणिक आणि व्यावसायिक पात्रता सिद्ध केलीत. कौतुकाची आणि दखल पात्र गोष्ट म्हणजे मॅडम ने काही काळातच माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेतील व्यवस्थापनाचा अभ्यास या विषयावर प्रबंध सादर करून चक्क डॉक्टरेट मिळवलीत. त्याबद्दल आपले त्रिवार अभिनंदन !!

या यशाचा प्रवास खडतर होता हे जाणकार जाणतात पण मोठ्या जिद्दीने आणि ध्येयाने झपाटून तसेच येणाऱ्या अनेक शारीरिक, मानसिक संकटांना सामोरे जात आपण हे यश संपादन केलेत. स्वत:ची उन्नती साधत असतानाच आपण शाळेतील विद्यार्थ्यांनाही सर्वांगीण विकासाच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्यात. त्यांच्या भाषा समृद्धीसाठी अनेक उपक्रम केलेत. अवांतर वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न केले. तज्ज्ञांच्या मुलाखती घेण्यासाठी विद्यार्थ्यांना तयार केले. वाचाल तर वाचाल. ग्रंथ भेट, पुस्तक आदान-प्रदान, वाचू आनंदे, लेखक तुमच्या भेटीला, असे अनेक उपक्रम आयोजित केले. म्हणूनच आपण विद्यार्थी प्रिय आहात. गेली अनेक वर्ष आपण शाळेच्या अभिरुची मंडळाच्या कार्यवाह पदाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडलीत. शतकोत्तररौप्य महोत्सव समितीच्या संपादक मंडळाचे क्लिष्ट काम लीलया केलेत. ठाण्यातील अनेक सामाजिक, सांस्कृतिक संस्थांच्या मोठ्या पदावर आपण आहात याचा सार्थ अभिमान आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे मॉरिशस येथे झालेल्या मराठी साहित्य सम्मेलनात आपण सूत्रसंचालन करून भारताचे प्रतिनिधीत्व केले.

समाजाने याची दखल घेत आपणास विविध पुरस्कारांनी सालंकृत केले. राज्यस्तरीय सावित्रीबाई आदर्श शिक्षिका पुरस्कार, अखिल भारतीय पत्रकार संघाचा सावित्रीबाई राष्ट्रीय पुरस्कार, राज्यस्तरीय खानदेशी अहिराणी कस्तुरी पुरस्कार, नवदुर्गा पुरस्कार, वसंत डावखरे स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार, रोटरी क्लब, लायन्स क्लबचे अनेक पुरस्कार तसेच अभिरुची मंडळाचा मानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार व संस्थेकडून मराठी विषयासाठी गुरु शिष्य पारितोषिक अशा अनेक पारितोषिकांचे, पुरस्कारांचे आपण मानकरी आहात.

आपल्या यशाच्या या गरुडपंखात बळ देण्यासाठी आपले कुटुंब, मित्र परिवार सतत सोबत असतात हे नमूद करण्यासारखे आहे. प्रतीक्षा मॅडम आपल्याला यशाच्या पुढील वाटचालीसाठी संस्थेकडून लक्ष लक्ष शुभेच्छा ! आपल्या वयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हा पुरस्कार मिळाला हा मणी कांचन योगच म्हणावा लागेल.

जीवेत शरद: शतम् !

**दिनांक : २४ एप्रिल २०२५**

| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | कार्यवाह |
|---|---|---|
| जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट, दादर |

जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट दादर, मुंबई

श्री. दादासाो तात्याबा सातपुते यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ

श्री. ज्ञानेश्वर तुकाराम मेटकरी पुरस्कृत

आद्य संस्थापक



कै. श्री. गो. ना. अक्षीकर

# आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार २०२४-२५

आयोजित

## सन्मानपत्र



**NILAJA PRAMOD PATIL**

"A good teacher can inspire hope, ignite the imagination, and instil a love of learning," but it takes an extraordinary principal to create and nurture an environment where such teaching can truly thrive. Your ability to lead with empathy, strength, and clarity is truly inspiring.

"Leadership is not about being in charge. It is about taking care of those in your charge." Your dedication to help others, your advocacy for student success, and your unrelenting support for teachers have made you a true role model.

You are a rare combination of discipline, honesty, principle, vision, decisiveness, imagination, tolerance, friendliness, spirituality, and creativity.

Your unwavering confidence—that whatever we do will be perfect, or that we are capable of only doing what is perfect—is deeply inspiring to all of us.

Under your visionary guidance, GEI's Blossom International School has blossomed not only in academics but also in the holistic development of every aspect of education.

Your selfless and dedicated support to the newly formed CBSE schools at Thane and Dadar reflects your strong devotion to the larger mission of GEI. We deeply honor your dedication and are elated to have you leading from the front.By virtue of your industrious perseverance and motivational guidance, we firmly believe you will continue to foster excellence in education and bring even greater prominence to the school's name.

This award is not just a title—it is a symbol of your tireless efforts and the enduring legacy you continue to build.

दिनांक : २४ एप्रिल २०२५

| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | कार्यवाह |
| --- | --- | --- |
| जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर |

# जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट दादर, मुंबई

## कै. विलासिनी राजाराम साळवी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ

## श्री. शैलेंद्र राजाराम साळवी पुरस्कृत

आद्य संस्थापक



कै. श्री. गो. ना. अक्षीकर

# आदर्श शिक्षक पुरस्कार (इंग्रजी माध्यम) २०२४-२५

आयोजित



## सन्मानपत्र

**Report – Mr. Vinod J. Jagtap (PE Assistant Teacher)**

It is with great pride and admiration that we present this appreciation report for Mr. Vinod J. Jagtap, our esteemed Physical Education Assistant Teacher, whose dedication, sportsmanship, and student-centric approach continue to uplift the spirit of GEI Chhabildas English Medium School.

Mr. Jagtap is not only known for his exceptional professionalism but also for being highly student-friendly, approachable, and compassionate—qualities that have made him a favorite among students. His ability to connect with learners and bring out the best in them through sports and physical training is truly commendable. Whether it is on the field or off it, Mr. Jagtap leads by example with his humility, patience, and ever-encouraging words.

A National Fencing Player and a consistent performer in the field of sports, Mr. Jagtap has been the recipient of several prestigious awards over the years. He brings a unique blend of experience, skill, and mentorship to our institution. His energy and enthusiasm continue to inspire our students to pursue sports not just as a subject but as a way of life.

Highlights of Achievements in the Year 2025:

1. Selected as a Technical Official at the 38th National Games 2025 – A prestigious recognition, Mr. Jagtap was chosen to serve as a Technical Official at the National Games held in Uttarakhand, where only highly experienced and qualified professionals are appointed to oversee events at a national level.

2. Senior National Referee and Technical Official – He played a key officiating role at the 46th Senior National Throwball Championship 2025, conducted in Bhopal, Madhya Pradesh, where his expertise and fair judgment were widely appreciated.

3. Senior State Referee – Mr. Jagtap was appointed as a Senior Referee in the 2nd Senior State Throwball Championship 2025 held at Nashik, a testament to his leadership and technical acumen at the state level.

Beyond these accolades, what sets Mr. Jagtap apart is his strong character, grounded values, and a genuine desire to see his students excel. His punctuality, discipline, team spirit, and integrity make him not just a sports mentor but a true educator in every sense.

We, at GEI Chhabildas English Medium School, are proud to celebrate the achievements of Mr. Vinod J. Jagtap. His success adds value not only to our institution but also serves as an inspiration for fellow educators and young athletes.

We extend our heartfelt congratulations and best wishes to him for continued success and excellence in the years to come.

दिनांक : २४ एप्रिल २०२५

| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | कार्यवाह |
|---|---|---|
| जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर |

# जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट दादर, मुंबई

## कै. श्री. ज्ञानेश्वर पंढरीनाथ मुळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ

## श्री. श्रीधर ज्ञानेश्वर मुळे पुरस्कृत

आद्य संस्थापक



कै. श्री. गो. ना. अक्षीकर

# आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार २०२४-२५



### आयोजित

# सन्मानपत्र

प्रति,

श्रीम. ब्लांची रिचर्ड रॉड्रीग्ज

सस्नेह सादर,

महोदया,

कै. श्री. ज्ञानेश्वर पंढरीनाथ मुळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री. श्रीधर ज्ञानेश्वर मुळे पुरस्कृत, आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराचे हे १५ वे वर्ष. सदर पुरस्कार आपणास प्रदान करताना आम्हाला अतीव आनंद होत आहे.

ज. ए. इ. ची छबिलदास लल्लुभाई प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळा, दादर येथे आपण गेली ९ वर्षे मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहात. अनुदानित शाळेत १९ वर्षे तसेच विना अनुदानित शाळेत साडेतीन वर्षे अशी साडेबावीस वर्षे शिक्षिका म्हणून आपण प्रदीर्घ सेवा केली आहे.

शाळा ही मुख्याध्यापकाचे प्रतिबिंब असते.

मुख्याध्यापक हा शाळा व समाज यांच्यामधील सेतूचे काम करतो.

काही व्यक्तींचे व्यक्तिमत्व व स्वभाववैशिष्ट्ये नैसर्गिकपणे नेता बनण्यासाठी योग्य असतात. अशा व्यक्तिमत्वापैकी आपण एक आहात. नेतृत्व, कल्पकता, आत्मविश्वास उपक्रमशीलता, निर्णयशक्ती सकारात्मकता ही आपल्या व्यक्तिमत्वाची काही खास वैशिष्ट्ये आहेत.

दादर सारख्या मुख्य शहर भागात शाळा असल्यामुळे शाळेची पटसंख्या स्थिर राहावी, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी आपण शाळेत विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे, उपक्रमांचे आयोजन करत असता.

शाळेमध्ये येणारे बहुतांश विद्यार्थी हे तळागाळातील, गरीब घरातील असल्यामुळे त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी आपण नेहमीच प्रयत्नशील आहात. अशा विद्यार्थ्यांसाठी आपण सामाजिक व लोकसहभागातून आर्थिक तसेच विविध वस्तूंची मदत करण्यासाठी प्रयत्न करत आहात.

शाळेमध्ये पटसंख्या वाढीसाठी अध्ययन - अध्यापनाचे नियोजन, नवागतांचे स्वागत, शालेय कार्यक्रम, क्षेत्रभेट, सहली, विविध सण-समारंभाचे आयोजन, पालकांचे संघटन इत्यादी द्वारे शालेय गुणवत्ता वाढवण्याचा आपण नेहमीच प्रयत्न करत आहात. संस्थेचे, शिक्षकांचे सहकार्य व पालकांना विश्वासात घेऊन अनेक प्रकारे वर्षभरात विविध कामांचे आपण नियोजन करत असता.

यासाठी संस्थेचे सहकार्य घेऊन परदेशी भाषा म्हणून फ्रेंच विषयाचे शाळेत अध्यापन केले जात आहे. पूर्व प्राथमिक विभागापासून सेमी इंग्रजी चालू केले आहे.

आपण स्वत: वर्गात जाऊन विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेता. स्पर्धा परीक्षा तसेच आंतरशालेय व विविध सहशालेय स्पर्धांचे आयोजन करत असता. शाळेला पुन्हा एकदा गतवैभव प्राप्त व्हावे, यासाठी आपण सदैव प्रयत्नशील आहात.

आपल्या सहकाऱ्यांचे ज्ञान, क्षमता व कल या बाबींचा उपयोग करून घेऊन त्यांना विशेष प्रोत्साहित करण्यासाठी आपण नेहमीच प्रयत्न करत असता.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या गतिशील व स्पर्धेच्या युगात सर्वच गोष्टींना वेग प्राप्त झाला आहे. या स्पर्धेच्या युगात आपण आपल्या शाळेचे अस्तित्व राखण्यासाठी, शाळेच्या उत्कर्षासाठी, आवश्यक क्षमता व कौशल्य स्वत:मध्ये तसेच सहकारी शिक्षकांमध्ये जाणीवपूर्वक विकसित करीत आहात.

शालेय सर्वांगीण विकासासाठी व बदलत्या काळासाठी सिद्ध होण्याचा आपला हा प्रयत्न खरोखरच लक्षणीय आहे.

आपल्या हातून हे शिक्षण सेवेचे पुण्य कर्म असेच घडत राहो.

हीच संस्थेकडून आपणास सदिच्छा....!

संस्थेतर्फे आपले मन:पूर्वक अभिनंदन !

दिनांक : २४ एप्रिल २०२५

| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | कार्यवाह |
|---|---|---|
| जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर | जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट, दादर |

# गौरवास्पद






OPEN WATER SEA SWIMMING ASSOCIATION

Reg. No.: MAHARASHTRA/46/2016

AFFILIATED TO

WORLD OPEN WATER SEA SWIMMING ASSOCIATION

Certificate of Honour

Awarded to Tanishka Jitendra Patil

born on 21/11/2016 for successfully completing SOLO SWIMMING EVENT

of 12 km from Atal Setu to Gateway of India

on 03/04/2025

FIT INDIA

Karthik Natesan | Sandeep Mhatre | Santosh Manohar Patil | R. Adm. P. D. Sharma (Retd.) | Ajay Manohar Vichare

हायस्कूल कल्याण (सुभेदार वाडा ) या
शाळेत इयत्ता ४ थी मध्ये शिकत असलेल्या

## कु तनिष्का जितेंद्र पाटील

या विद्यार्थिनीने अटल सेतू ते गेटवे ऑफ
इंडिया हे १२ किमी सागरी अंतर ३ तास ११
मिंनीटांमध्ये*पूर्ण करून एक नवीन विक्रम
केला आहे.




नाव: सोनल मनीष जेट्टी.

वय:१४  पदवी-  ब्लॅकबेल्ट पहिली पूर्ण.

शाळेचे नाव: एम.एच. हायस्कूल ठाणे (डब्ल्यू)

## तिचे यश खालीलप्रमाणे आहे:-

१- अल्टिमेट मिक्स्ड मटेरियल आर्ट्स असोसिएशन (आंतरराष्ट्रीय अजिंक्यपद विजेता- काता गोल्ड, कुमिते गोल्ड

२- बाल्मिकी विकास संघ टॉर्नामेंट विजय-काता रौप्य/कुमिते सुवर्ण.

३- ३९ वी महाराष्ट्र राज्य क्रीडा जीत कुने-डो अजिंक्यपद विजेता ठाणे २०२३ विजय-कुमिते ब्रोन्स

४- ९ वी ऑल स्टार्ट्स राष्ट्रीय पात्र अजिंक्यपद विजेता- काता गोल्ड/कुमिते सुवर्ण.

५- खासदार खेल मोहोस्तव मुंबई विजय-कुमिते ब्रोन्स

६- ९ वी ब्लू स्टेट लेव्हल ओपन कराटे अजिंक्यपद विजेता- काता गोल्ड/कुमिते रौप्य.

७- अल्टिमेट मिक्स्ड मटेरियल आर्ट्स असोसिएशन महाराष्ट्र राज्य कराटे विजय- काता गोल्ड/कुमिते रौप्य.

८- ६ वी राष्ट्रीय कराटे डू अजिंक्यपद विजेता- काता रौप्य/कुमिते रौप्य.

९- २१ वी आंतरराष्ट्रीय क्रीडा जीत कुने-डो

अजिंक्यपद मुंबई भारत २०२३ विजय- काता ब्रोन्स / कुमिते ब्रॉन्स

१०- हिरो सुमन तलवार कप २०२३ विजय - काता गोल्ड/कुमिते गोल्ड.

११- सीएमएए आंतरराष्ट्रीय चॅम्पियनशिप कप २०२३ विजय-काता रौप्य/कुमिते गोल्ड.

१२- सिक्स टायगर कप ऑल भारत ओपन कराटे चॅम्पियनशिप विजय-काता

रौप्य/कुमिते गोल्ड.

१३-शॉटोकप २०२४ ऑल इंडिया ओपन कराटे चॅम्पियनशिप विजय-काता गोल्ड कुमिते गोल्ड.

१४- शा झा रयू कप मॅरास्ट्रो स्टेट ओपन कराटे चॅम्पियनशिप २०२३ विजय-काता गोल्ड कुमिते गोल्ड.

१५- फुनाकोशी शोतोकान कराटे असोसिएशन वर्ल्ड जपान २०२४ विजय-काता गोल्ड कुमिते गोल्ड.

१६-सरकारी स्पर्धा- भारत सुबाकी आव्हान विजय- कुमिते रौप्य

१७-आंतरराष्ट्रीय स्पर्धा.

१- थायलंड कराटे कप २०२३ आंतरराष्ट्रीय चॅम्पियनशिप बँकॉक विजय- काता गोल्ड/कुमिते गोल्ड.

२- शाखांडोल आंतरराष्ट्रीय कराटे चॅम्पियनशिप २०२४ नेपाळ (काठमांडू)

जिंकले- काता गोल्ड कुमिते सुवर्ण.

## जागतिक अजिंक्यपद

२४ वी एफएसकेए विश्वचषक कराटे चॅम्पियनशिप गोवा, भारत २०२४ जिंकले-

काता गोल्ड कुमिते गोल्ड

पुरस्कार

१- महाराष्ट्राचा सर्वोत्तम खेळाडू पुरस्कार २०२४

२- भारतीय राष्ट्रीय पुरस्कार २०२५.

सर्वोत्तम रेफ्री/फाइट ट्रॉफी (१०.)

**एकूण पदके**

**सुवर्ण - १९**

**रौप्य - ९**

**तपकिरी - ३**

सुजल निंभोरकर
(National Swimmer)

मो. ह विद्यालय, मराठी माध्यम, नववी-(अ) DOB -26.11.2009

- वयाच्या आठव्या वर्षी मारोतराव शिंदे तलाव, ठाणे येथे पोहायला सुरुवात केली.
- सध्या दादर महात्मा गांधी स्विमिंग पूल येथे प्रशिक्षण घेत आहे.
- दररोज सकाळी 2-3 तास पोहण्याचा सराव.
- योग्य आहार आणि शाळेचा अभ्यास.

Achievements:

- 2022: सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सव, ठाणे - 50 मीटर फ्रीस्टाइल - द्वितीय क्रमांक.
- 2022: राज्य अम्युचर ॲक्वाटीक असोसिएशन, चिवला बीच, मालवण - 1 Km मेरिट प्रमाणपत्र.
- 2023: राष्ट्रीय स्विमॅथॉन, पोरबंदर, गुजरात - Km Sea Swimming मेरिट प्रमाणपत्र (1 पदक )
- 2023: Sun Rock to Gateway of India, मुंबई - Km Sea Swimming मेरिट प्रमाणपत्र (1 पदक).
- 2024: राज्यस्तरीय स्विमिंग स्पर्धा, चिवला बीच, मालवण - मेरिट प्रमाणपत्र (1 पदक).
- 2024: राष्ट्रीय स्विमॅथॉन, पोरबंदर, गुजरात - 5 Km Sea Swimming मेरिट प्रमाणपत्र (1 पदक).
- 2025: राष्ट्रीय स्विमॅथॉन, पोरबंदर, गुजरात - 5 Km Sea Swimming मेरिट प्रमाणपत्र (1 पदक).

- 2025: महाराष्ट्र स्पोर्ट्स कौन्सिल ऑफ द डेफ, अकोला
  (Swimming Pool)

  200 मी. फ्री स्टाईल - द्वितीय क्रमांक (रोप्य पदक)

  100 मी फ्री स्टाईल (रिले) - तृतीय क्रमांक (कांस्यपदक).

2025: राष्ट्रीय गेम ऑफ द डेफ चॅम्पियनशिप स्पर्धा
(Swimming Pool)

200 मी. फ्री स्टाईल सहभाग प्रमाणपत्र.

AIM जलतरण स्पर्धेत आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करणे.

शाळेच्या व्यवस्थापनाचे आभार:

- शाळेच्या व्यवस्थापनाकडून मिळालेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल खूप खूप धन्यवाद.

भिवंडी निजामपूर महानगरपालिका आयोजीत जिल्हा स्तरीय खेळात प्राविण्य मिळवलेल्या खेळाडूंची नावे.

11th आर्ट्स मधील विद्यार्थिनी श्रावणी गणेश चेंडगे ही 200_मीटर_धावणे* या खेळात द्वितीय क्रमांकाने विजयी झाली आहे.

11th आर्ट्स मधील विद्यार्थिनी राणी निरंजन मल्लिक ही थाळी_फेक या खेळात प्रथम क्रमांकाने विजयी झाली आहे.

12th आर्ट्स मधील विद्यार्थिनी रोशनी निरंजन मल्लिक ही उंच_उडी या खेळात प्रथम क्रमांकाने विजयी झाली आहे व भाला_फेक या खेळात द्वितीय क्रमांकाने विजयी झाली आहे.

12th कॉमर्स मधील विद्यार्थिनी अनामिका भिक्षापाती गज्जेली ही थाळी _फेक या खेळात द्वितीय क्रमांकाने विजयी झाली आहे.

१२th आर्ट्स मधील विद्यार्थी साहिल असिफ खान हा थळी_फेक या खेळात प्रथम क्रमांकासह विजायी झाला आहे .

१२th आर्ट्स मधील विदयार्थी गणेश रवी खांजोडे हा विद्यार्थी २००_मीटर_धावणे या खेळात तृतीय क्रमांकाने विजयी झाला आहे .

शुक्रवार, दिनांक ११/०४/२०२५ रोजी आमदार महेश चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली परशुराम टावरे स्टेडियम येथे आयोजित भिवंडी ऑलिंपिक जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये अकरावी आर्ट्समधील श्रावणी गणेश शेंडगे हिने 200 मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

अकरावी कॉमर्समधील विद्यार्थी विशाल राजू धुमाळ याने देखील 200 मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला.

तसेच, अकरावी आर्ट्समधील विद्यार्थिनी राणी निरंजन मल्लिक हिने थाळीफेक या खेळात 24 मीटर अंतरावर थाळी फेकून प्रथम क्रमांक मिळवला, तसेच भालाफेक या खेळात 18 मीटर भाला फेकून देखील प्रथम क्रमांक पटकावला.


HARD



\




BHIWANDI
383





TWIN SISTERS FROM BLOSSOM SCHOOL EMBARK ON HISTORICAL ADVENTURE

"Tiny Trekkers: 5-Year-Old Twin Sisters Embark on 100-Fort Adventure"

"Small but Mighty: 5-Year-Old Twin Sisters from Blossom International school in Dombivili Explore Maharashtra's 100 Forts"

In an extraordinary feat of adventure and determination, five-year-old twin sisters, Presha Kadam and Reshavi Kadam, students at Blossom International School, Dombivili, have embarked on an ambitious journey to explore 100 forts across Maharashtra. The duo, who began their adventure at the age of three, had already climbed 12 forts themselves and till date have completed 100 forts, including some of the most challenging ones like Kalsubai, Yashivay Salhare, Kalavantin, Sudhagad, Bhaskargard, Harshchandragad, and Sagargad.

Their remarkable achievement has earned them a place in the Indian Records book for climbing the highest number of forts at the youngest age. Their parents, Mr. Paresh Kadam and Mrs. Reshma Kadam have been instrumental in supporting their daughters' passion for exploration and history.

In an era where children are increasingly drawn to technology and artificial intelligence, Presha and Reshavi's love for nature, history, and adventure is truly inspiring. Their parents expressed pride and joy, saying, "We're thrilled to see our girls develop a passion for history and exploration. This experience will undoubtedly shape their young minds and broaden their horizons."

The twin sisters' quest to explore 100 forts is not only a thrilling adventure but also an enriching educational experience, allowing them to learn about Maharashtra's rich cultural heritage and historical significance.

We wish Presha and Reshavi all the best as they continue their journey and look forward to hearing about their future adventures!

7-YEAR-OLD WONDER: DOMBIVLIKAR SANGHARSH SWIMS 17 KM ATAL SETU TO GATEWAY OF INDIA

Dombivli, April 18 - In an extraordinary feat of endurance and determination, 7-year-old Sangharsh has successfully swum 17 kilometers from Atal Setu to the Gateway of India. Starting in the early morning darkness at 3:45 a.m., Sangharsh completed the expedition in an impressive 3 hours and 11 minutes.

Despite facing numerous challenges, including water pollution, strong tides, waves, and oil slicks, Sangharsh persevered and swam continuously without rest. His determination and hard work paid off as he reached the Gateway of India at 6:56 a.m.

What's remarkable about Sangharsh's achievement is that he learned to swim in just a short period of time. Enrolled in swimming training at Yash Gymkhana three months ago, he quickly picked up the skills and advanced to sea training under coach Santosh Patil.

Student of Blossom International School, Dombivili Sangharsh Nikam's remarkable feat has earned him accolades from his coaches, parents, and relatives. We congratulate this young achiever on his outstanding accomplishment and wish him continued success in his swimming journey!






नाव श्री संजय गुलाबराव पाटील

शिक्षण_एम ए बी एड

सेवा 25 वर्ष

हे एन आय हायस्कूल या शाळेतील एनसीसी चे 6 महाराष्ट्र बटालियन आर्मी विभाग यामध्ये F/O फर्स्ट ऑफिसर म्हणून आजतागायत कार्य करीत आहे

एनसीसी विभागामार्फत बेस्ट ड्रिल म्हणून अवॉर्ड प्राप्त आहे

उरण तालुक्यामध्ये एकमेव एनसीसी विभाग असल्यामुळे मुलांना व मुलींना आर्मी विभागाचे प्रशिक्षण दिले जाते यामुळे मागील वर्षी मुंबई विभागात फायरिंग कॉम्पिटिशन मध्ये मुलाचे सिलेक्शन झाले होते

सामाजिक कार्य

कोविडच्या काळात सलग 25 दिवस कोविड सर्वेक्षण व जनजागृती मोहिमेत काम केले

पर्यावरण संतुलन म्हणून दरवर्षी वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण केले जाते

विशेष बाब

प्रवास व शैक्षणिक क्षेत्रभेटीची आवड

## ब्लॉसम , इंटरनॅशनल, डोंबिवली




On the auspicious occasion of Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti, GEI's Blossom International School came together to pay tribute to the legendary Maratha warrior king. The celebration was marked by a special informative session by esteemed guest, Aatish Kulkarni, who shed light on the 7 Sutras of Shivaji Maharaj.

The event began with a traditional ceremony, where students and staff members offered floral tributes to the iconic leader. Aatish sir were being felicitated by the school management member Mr. Sanjay Kanitkar, Principal Mrs. Nilaja Patil accompanied by Vice Principal Mrs. Trupti Taumar.

Aatish Kulkarni, a renowned expert on Shivaji Maharaj's life and teachings, took the stage to share insights on the 7 Sutras that defined the great king's approach to leadership, warfare, and governance. These timeless principles, Kulkarni explained, hold relevance even in today's fast-paced world.

The 7 Sutras of Shivaji Maharaj

1. **Understanding the Need and Act Accordingly** Shivaji Maharaj's ability to assess situations and respond effectively was a hallmark of his leadership. Kulkarni emphasized the importance of understanding the needs of others and taking decisive action.

2. **Intention** Shivaji Maharaj's intentions were always clear and focused. Kulkarni stressed the significance of having a strong intention and vision in achieving success.

3. **Courage and Consideration Equation** Shivaji Maharaj's bravery and consideration for others were key factors in his success. Kulkarni highlighted the importance of balancing courage with consideration in our personal and professional lives.

4. **Creativity** Shivaji Maharaj's innovative approach to warfare and governance was a key factor in his success. Kulkarni emphasized the importance of thinking outside the box and embracing creativity in our endeavours.

5**. Focus on What is Important** Shivaji Maharaj's ability to prioritize and focus on what was truly important enabled him to achieve his goals. Kulkarni emphasized the need to prioritize and stay focused in today's distracted world.

6**. Cost-Benefit Ratio** Shivaji Maharaj's strategic thinking and ability to weigh the costs and benefits of his decisions were crucial to his success. Kulkarni explained the importance of considering the cost-benefit ratio in our decision-making processes.

7. **Networking** Shivaji Maharaj's ability to build and maintain strong relationships with his allies and subjects was essential to his success. Kulkarni highlighted the importance of networking and building strong relationships in our personal and professional lives.

Kulkarni's engaging presentation sparked a lively discussion among the students, who were inspired by the timeless wisdom of Shivaji Maharaj. The session concluded with a Q&A session, where students posed thought-provoking questions to Kulkarni.

In the words of Aatish Kulkarni, Shivaji Maharaj's 7 Sutras offer a powerful framework for achieving success and making a positive impact in the world. By embracing these timeless principles, we can unlock our full potential and create a brighter future for ourselves and others.

**GEI’s Blossom International School Excels at “Bharat Ko Jano” Quiz Competition**

GEI’s Blossom International School students, Shruti Nahak and Rushil Gujrathi, have secured the second rank in the senior category at the regional level “Bharat Ko Jano” quiz competition, organised by Bharat Vikas Parishad Dombivli.

This remarkable achievement is a testament to the students’ hard work, dedication, and passion for learning. The competition aimed to increase awareness about India’s distinctive features, culture, and values among school children, promoting love and pride for our country.

The students’ journey began with a branch-level competition, where they secured the first rank, followed by a Prant-level competition, where they again emerged victorious. Their outstanding performance earned them a spot in the West region “Bharat Ko Jano” quiz competition, held on November 17.

The school received a trophy, along with individual trophies and certificates, as an award for this achievement. We congratulate our students on their outstanding performance and thank Bharat Vikas Parishad Dombivali for organizing this enriching program.

At the school-level, GEI’s Blossom International School focuses on fostering healthy participation and promoting a love for learning. It believes that such competitions provide valuable opportunities for students to grow, learn, and develop essential skills.

The school looks forward to many more achievements and milestones in the future.

**Shruti Nahak and Rushil Gujrathi, students of GEI’s Blossom International School,**

**with their trophies and certificates, proudly displaying their achievement.**



# 🙏 धन्यवाद 🙏